# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/23
दिनांक – ५ सप्टेंबर, २०१८

<u>परिपत्रक</u> :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचे पत्र **क्र.जा.क्र.मराठाआ/मराठा आरक्षण/पीएचडी शिष्यवृत्ती माहिती/२०१८/१९/१८६३/पुणे, दिनांक २० ऑगस्ट, २०१८** अन्वये मराठा आरक्षणा संदर्भात, मराठा समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक मागासलेपणा बाबत अहवाल तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग करत आहेत. त्यानुसार मुंबई विद्यापीठ विभागातील व विद्यापीठ मान्य संशोधन केंद्रात वेगवेगळया शिष्यवृत्ती पूर्ण वेळ पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित/पीएचडी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची जात प्रवर्गानुसार माहिती उपलब्ध करून आयोगास त्वरित देणे आहे.

तसेच, असेही नमूद करण्यात येते की, वर नमुद केलेल्या शासन पत्रामधील मजकुराचा काळजीपूर्वक अभ्यास करून सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार माहिती–महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, नवीन प्रशासकीय इमारत खोली क्र. ३०७, तिसरा मजला, विधान भवना समोर, पुणे – ४११००१, यांना त्वरित सादर करावी.

परिपत्रकासोबत उपरोक्त संदर्भिय पत्र विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

<u>माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u> –

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालयासह) आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थाचे विभाग प्रमुख/संचालक, रत्नागिरी उपकेंद्र व ठाणे उपकेंद्र.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

११११८

REG/ICD/2018-19/606

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

नवीन प्रशासकीय इमारत खोली क्र. ३०७, तिसरा मजला, विधान भवना समोर, पुणे- ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०- २६०५३०५६ ई.मेल. msbccpune@gmail.com

जा.क्र.मरामाआ/मराठा आरक्षण/पीएचडी शिष्यवृत्ती माहिती/२०१८/१९/७६३ /पुणे दि. २०/०८/२०१८

प्रति,
मा. कुलगुरु

विषय :- मराठा आरक्षण -विद्यापीठात विभागातील व विद्यापीठ मान्य संशोधन केंद्रात वेगवेगळ्या शिष्यवृत्तीवर पूर्ण वेळ पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित/पीएचडी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची जात प्रवर्गा नुसार माहिती उपलब्ध होणेबाबत...

संदर्भ :- मा. सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई ३२ यांचे पत्र क्र. सीबीसी-१२/१७/प्र.क्र.७३/मावक-दि.३०/०६/२०१७.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, मराठा समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक मागासलेपणा बाबत वरील संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याचे काम या आयोगाकडे सोपविण्यात आलेले आहे.

आपल्या विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या शिष्यवृत्ती अंतर्गत पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची जात प्रवर्ग निहाय माहिती "प्रपत्र-अ" मध्ये प्रथम प्राधान्याने तयार करुन आयोगाच्या कार्यालयास दि.३१/०८/२०१८ पर्यंत कृपया पाठवावी.

आपला,
Deshmukh
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग,
पुणे.

सहपत्र :- प्रपत्र "अ"

प्रत :- महितीस्तव सविनय सादर.
१.मा.अध्यक्ष, यांचे स्विय सहाय्यक,महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (शिबीर कार्यालय)मुंबई-१
२.मा.सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय मुंबई-३२
३.खाजगी सचिव, मा.मंत्री महसुल तथा अध्यक्ष मराठा आरक्षण मंत्रीगट उपसमिती मंत्रालय,मुंबई-३२ यांचे कार्यालय

## प्रपत्र "अ"

विद्यापीठ विभागात व विद्यापीठ मान्य संशोधन केंद्रात वेगवेगळया शिष्यवृत्तीवर पूर्ण वेळ पीएचडी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची जात प्रवर्गानुसार माहिती वर्ष-२०१५-१६, २०१६-१७,२०१७-१८ (वर्ष निहाय स्वतंत्रपणे माहिती द्यावी)

| अ.क्र | पीएचडी | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण विद्यार्थ्यांपैकी खुल्या संवर्गातील विद्यार्थी (OPEN) | खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांपैकी मराठा जातीचे विद्यार्थी संख्या | अनुसूचित जातीचे विद्यार्थी संख्या (S.C) | अनुसूचित जमातीचे विद्यार्थी संख्या (S.T) | वि.जा. (अ) विद्यार्थी संख्या (V.J.) | भ.ज.(ब) विद्यार्थी संख्या (N.T) | भ.ज. (क) विद्यार्थी संख्या (N.T) | भ.ज(ड) विद्यार्थी संख्या (N.T) | इतर मागासवर्ग विद्यार्थी संख्या (OBC) | विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थी संख्या (SBC) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विज्ञान | | | | | | | | | | | | |
| २ | कला | | | | | | | | | | | | |
| ३ | वाणिज्य | | | | | | | | | | | | |
| ४ | समाज विज्ञान | | | | | | | | | | | | |
| ५ | विधी | | | | | | | | | | | | |
| ६ | शिक्षण/शारिरीक शिक्षण | | | | | | | | | | | | |
| ७ | गृह विज्ञान/गृह अर्थशास्त्र | | | | | | | | | | | | |
| ८ | औषधी शास्त्र | | | | | | | | | | | | |
| ९ | अभियांत्रिकी | | | | | | | | | | | | |
| १० | व्यवस्थापन | | | | | | | | | | | | |
| ११ | इतर | | | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | | | |